**अर्थ**

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार,
इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

**प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.**

*वर्गणीचे दर :*

**वार्षिक : ६ रु.** **सहामाही : ३ रु.**

**किरकोळ अंक : ४ आ.**

*जाहिरातीचे दर :*

कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.
चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ताः–
"अर्थ"
"*दुर्गाधिवास*" पुणें ४.

REGISTERED No. B. 3434

# अर्थ

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख १५ जून, १९४९ | अंक २४

श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

## युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

# सर्व प्रसिद्ध माल

भिंतीला लावण्याचे रंग, छापण्याची शाई, एनॅमलचे कच्चे व पक्के रंग

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें २ | केळकर बंधू, (शाखा) मेनरोड, नाशिक.

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


# विविध माहिती

**मध्यभारतांत पिकांवर नियंत्रण**—मध्यभारतांतील अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेला उत्तेजन देण्यासाठी लागवडीवर नियंत्रण बसविण्याचें घाटत आहे. प्रत्येक शेतकऱ्यानें आपल्या एकूण जमिनींपैकीं कांहीं हिस्सा सरकारी हुकुमांत समाविष्ट केलेल्या पिकासाठींच वापरला पाहिजे असा हुकूम काढण्यांत येणार असल्याचें समजतें. इंदूर संस्थानच्या हद्दींत अशा प्रकारचें नियंत्रण पूर्वींच घालण्यांत आलें होतें.

**मुंबई प्रांतासाठी आणखी यांत्रिक नांगर**—मुंबई प्रांतांत शेतीसाठीं सध्या १०० यांत्रिक नांगर वापरण्यांत येत आहेत. ह्या नांगरांत आणखी ४० नांगरांची भर लवकरच पडणार आहे. आणखी ३५० नांगरांची मागणी करण्यांत आली असून ते हातीं आले म्हणजे प्रांतांत ५०० नांगर जमीन नांगरण्याचें काम करूं लागतील. ह्या नव्या ३५० नांगरांपैकीं जास्तींत जास्त नांगर सहकारी पद्धतीनें शेती करणाऱ्या संस्थांना प्रथमतः देण्यांत येणार आहेत असें कळतें.

**पाकिस्तानांतील कापडाच्या नव्या गिरण्या**—पाकिस्ताननें आधुनिक यंत्रसामुग्री बसविलेल्या सहा कापडाच्या गिरण्या उभारल्या आहेत. ह्या सर्व गिरण्यांत मिळून १ ते १॥ लाख चात्या आहेत. चालू वर्ष संपण्याच्या सुमारास ह्या गिरण्यांतून लक्षावधि वार कापड बाहेर पडूं लागेल. ह्या सहा गिरण्यांपैकीं एका गिरणीचें भांडवल ७५ लाख रुपये असून तींत २०,००० चात्या आणि ६०० माग आहेत. भावलपूर संस्थानच्या हद्दींत असलेल्या दुसऱ्या गिरणींत ३१,८०० चात्या आणि ३०० माग आहेत.

**पवनचक्क्यांना अनुकूल परिस्थिति आहे काय?**—हिंद सरकारनें सहा ठिकाणीं पवनचक्क्या बसवून शेतीला पाणी पुरविण्याची योजना प्रयोग म्हणून आंखली आहे. तथापि ह्या बाबतींत जी माहिती गोळा करण्यांत आली आहे तीवरून असें दिसतें कीं मुंबई प्रांतांतील बहुतेक भागांत पवनचक्क्यांना अनुकूल अशी परिस्थिति नाहीं. पवनचक्की फिरण्यासाठीं ताशीं कमींत कमी ६ मैल वेगानें वहाणाऱ्या वाऱ्याची आवश्यकता आहे. पुण्यापुरतेंच पहावयाचें, तर असा वारा फक्त एप्रिल ते सप्टेंबर ह्या काळांतच वाहातो. १९३७ सालीं विजापूर जिल्ह्यांत शेतीच्या पाण्यासाठी पवनचक्क्यांचा उपयोग करून पहाण्यांत आला. परंतु तो फारसा यशस्वी झाला नाहीं. अमेरिकेंत पवनचक्क्या वापरण्यांत येतात त्या मुख्यतः घरांना पाणी पुरवठा करण्यासाठीं; शेतीला पाणी पुरविण्यासाठीं त्यांचा उपयोग केला जात नाहीं. शिवाय दुसरें असें कीं, ठराविक वेगानें वहाणारा वारा लागोपाठ १५ दिवस बंद पडला तर त्यावर अवलंबून असणारीं पिकें वाळून जाण्याचा संभव आहे.

**सिनेमा-गृहांचा संप**—सिनेमा-गृहांच्या मालकांकडून सरकार करमणुकीच्या कराच्या रूपानें जबर कर वसूल करतें असा मालकांचा दावा आहे. ह्या जबर कराविरुद्ध निषेध व्यक्त करण्यासाठीं हिंदुस्थानांतील सुमारें २,२०० सिनेमागृहें ता. ३० जून रोजीं बंद ठेवण्यांत येणार आहेत. हिंदुस्थानांतील सिनेमा गृहांच्या मालकांच्या १४ संघटना असून त्यांत देशांतील ९० टक्के सिनेमा-गृहांचा समावेश होतो. सध्या सिनेमा-गृहांकडून तिकिट विक्रीच्या जवळ जवळ ६० टक्के रक्कम करमणुकीवरील कर व इतर कर म्हणून घेतली जाते असें म्हणतात.

**वार्तापट नामशेष होणार**—गेलें महायुद्ध संपल्यापासून अमेरिकेंतील चित्रपटगृहांतून वार्तापट पाहूं इच्छिणाऱ्या प्रेक्षकांची संख्या घटत चालली आहे. सिनेमागृहांतून वार्तापट दाखविण्याचें प्रमाण हळूहळू कमी करण्यांत येत आहे. तरी पण प्रेक्षकांच्या तक्रारी आलेल्या नाहींत. टेलिव्हिजनच्या साह्यानें चालू घडामोडी तावडतोब पहाण्याची सोय झाल्याचा हा परिणाम आहे. न्यूयॉर्कमधील १०८ सिनेमागृहांनीं आणि न्यू जेरेसीमधील ४० सिनेमागृहांनीं वार्तापट दाखविण्याचें अजिबात बंद करण्याचें ठरविलें आहे.

**मुंबई बंदरांतील आयात**—मुंबई बंदरांतून १९४९ च्या जानेवारींत ३५·२२ कोटी रुपयांच्या मालाची आयात करण्यांत आली. गेल्या वर्षी ह्याच महिन्यांत १६·९८ कोटी रुपये किंमतीचा माल आयात झाला होता. जानेवारी, १९४९ ह्या महिन्यांत ५·६३ कोटी रुपये किंमतीच्या मालाची निर्यात झाली. १९४८ च्या जानेवारींत ५·८५ कोटीच्या मालाची निर्यात झाली होती. इजिप्त, ब्राझिल, हॉलंड आणि पेरू ह्या देशांकडून आयात होणाऱ्या मालांत वाढ झाली. ९ कोटी रुपयांचा कापूस, ३ कोटी रुपयांचीं यंत्रें आणि १॥ कोटी रुपयांचें खनिज तेल आयात करण्यांत आलें.

**ओरिसांत विजेचें केंद्र**—ओरिसा प्रांतांत चौद्वार येथें विजेच्या उत्पादनाचें एक केंद्र उभारण्यांत येणार आहे. ह्या केंद्राचा कोनशिला समारंभ नुकताच साजरा झाला. केंद्रांत ५,००० किलोवॅट वीज निर्माण होऊं शकेल. ट्यूब वेल्स खणून त्यांतील पाणी विजेच्या पंपांनीं बागायतीसाठीं खेचावयाचें, अशी योजना आखण्यांत आली आहे.

**मध्यम वर्गीयांच्या उत्पन्नाचा व्यय**—संयुक्त प्रांताच्या कांहीं भागांतील मध्यमवर्ग आपल्या उत्पन्नाचा व्यय कशा तऱ्हेनें करतो ह्यासंबंधीं आंकडेवार माहिती गोळा करण्याचें काम, संयुक्त प्रांत सरकारच्या आंकडे शास्त्रीय खात्यानें हातीं घेतलें होतें. हें काम आतां पूर्ण झालें आहे.

**बटाट्याचीं आणि रताळ्याचीं पिकें**—मुंबई प्रांतांतील अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेचा एक भाग म्हणून सरकार बटाटे आणि रताळीं ह्यांचीं पिकें काढणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत करीत आहे. यंदा गेल्या वर्षापेक्षां अधिक बटाटे पिकविण्याची योजना आखण्यांत आली आहे. सातारा, बेळगांव, नगर, धारवाड, नाशिक आणि पुणें ह्या जिल्ह्यांतील गरीब शेतकऱ्यांना बटाटे पिकविण्यासाठीं मदत म्हणून २२,००,००० रुपयांचीं कर्जें देण्यांत येणार आहेत. ह्या कर्जाचा उपयोग करून त्यांनीं सरकारच्या शेतकी खात्याकडून बटाट्याचें बियाणें आणि पेंडीचें खत विकत घ्यावयाचें आहे. येत्या खरीपाच्या हंगामांत ५,३३० एकर जमीन बटाट्याच्या पिकाखालीं आणण्याची योजना आहे. गेल्या वर्षी ५,००० एकर जमिनींत बटाटा पिकविण्यांत आला होता. चालू हंगामांत १३,६०० टन बटाटे पिकतील असा अंदाज करण्यांत आला आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १५ जून १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## विमा—कायद्यांतील दुरुस्त्यांचें स्थूल स्वरूप

हिंदुस्थान सरकारनें १९३८ च्या विमाविषयक कायद्यांत आणखी दुरुस्ती करणाऱ्या बिलाचा मसुदा तयार केला असून तो विमाविषयक प्रमुख संस्थांकडे त्यांचें मत अजमावण्यासाठी पाठविला आहे. त्यांचें मत विचारांत घेऊन बिलांत सुचविण्यांत आलेल्या दुरुस्त्यांत सरकार सुधारणा करण्याचा संभव आहे.

बिलाच्या मसुद्यांतील कांहीं प्रमुख कलमांचा सारांश पुढें दिला आहे. विमा कंपन्यांचें भांडवल आणि भागीदारांचा मताधिकार ह्या बद्दल कांहीं विशिष्ट अटी घालण्यांत आल्या आहेत. ( १ ) कंपनीचें भांडवल फक्त ऑर्डिनरी भागांचेंच असलें पाहिजे आणि त्यांची दर्शनी किंमत सारखी असली पाहिजे. ( २ ) भागांवरील भांडवलाचे हप्ते देण्यासंबंधीं जी एक वर्षाची मुदत असेल तेवढी सोडून इतर वेळीं सर्व भागांवरील वसूल भांडवल सारखेंच असलें पाहिजे. ( ३ ) भागीदारांचा मताचा अधिकार त्यांच्या नांवावर असलेल्या भागांच्या प्रमाणांतच असला पाहिजे. आयुष्याच्या विम्याचा धंदा करणाऱ्या कुठल्याही कंपनीला आपल्या भागांच्या वर्गावर्गीची नोंद करतांना पुढील बाबी पहाव्या लागतील. कंपनीचे भाग विकत घेणारानें भाग आपणासाठी अगर दुसऱ्या हितसंबंधीयासाठी घेत आहोंत किंवा काय ह्यासंबंधीं खुलासा केला पाहिजे. दुसऱ्यासाठी घेतले असतील तर त्या हितसंबंधीयाचें नांव, धंदा, पत्ता वगैरे दिला पाहिजे आणि त्याच्या हितसंबंधाचा हिस्सा स्पष्ट केला पाहिजे. भाग विकत घेणाऱ्याचे नांवावर कंपनीच्या एकूण वसूल भांडवलाच्या ५ टक्क्यापेक्षां अधिक किंमतीचे भाग होत असतील, तर भाग वर्ग करतां येणार नाहीं. भाग विकत घेणारी जर एकादी बँक अगर भांडवल गुंतविणारी कंपनी असेल तर वसूल भांडवलाच्या २॥ टक्क्यापेक्षां अधिक भाग तिला आपल्या नांवावर चढवितां येणार नाहींत. अशा बदलाला सरकारची आगाऊ परवानगी घेण्यांत आली असेल तर मात्र चालेल.

### २७ वें कलम

हिंदुस्थानांतील प्रांतांत निघालेल्या अगर नोंदलेल्या कोठल्याही विमा कंपनीनें पॉलिसींच्या एकूण जोखमेच्या किमान ५० टक्के रकमेची गुंतवणूक केली पाहिजे. त्यापैकीं २५ टक्के रकम सरकारी रोख्यांत आणि २५ टक्के सरकारी अगर सरकारनें मान्य केलेल्या रोख्यांत गुंतविली पाहिजे. २७ व्या, पैसे गुंतविण्यासंबंधीच्या कलमांत आणखी दुरुस्ती सुचविण्यांत आली आहे. विमा कंपनीच्या अखत्यारांत असलेल्या रकमेपैकीं २ टक्क्यापेक्षां अधिक रकम कायम स्वरूपाच्या अगर करंट स्वरूपाच्या ठेवींच्या रूपानें, कोणच्याही एकाच बँकेकडे ठेवतां येणार नाहीं. ठेवींची ही एकूण रकम कोणत्याही दिवशीं निश्चित करतांना, बँकेनें, विमा कंपनीतर्फें त्या दिवसापूर्वीं ३० दिवस जे हप्ते जमा केले असतील त्यांची रकम वजा केली जाईल. ज्या विमा कंपन्यांनीं आपल्या पैशाची गुंतवणूक वरील कलमाप्रमाणें केली नसेल त्यांनीं हें कलम अंमलांत आल्यापासून ३० दिवसांच्या आंत कंट्रोलर जनरलला नियमबाह्य असलेल्या गुंतवणुकीबाबत अहवाल सादर करावयाचा आहे.

मसुद्याच्या ३१ (ब) ह्या कलमांत, विमा—कंपन्यांच्या चालकांनीं भलताच मोठा मोबदला घेऊं नये म्हणून त्यांच्यावर बंधन घालण्याचे अधिकार सरकारनें आपल्याकडे घेतले आहेत. एखादी व्यक्ती कंपनीच्या ऐपतीच्या बाहेर मेहनताना घेत आहे असें सरकारला वाटल्यास ६ महिन्यांच्या आंत अशा व्यक्तीनें, सरकारनें ह्याबाबत दिलेल्या सूचनांबरहुकूम सुधारणा केली पाहिजे असा ह्या कलमाचा सारांश आहे. प्रत्येक वर्ष संपल्यावर पहिला महिना संपण्यापूर्वीं, मागील सालीं एकाद्या व्यक्तीला एकाद्या महिन्यांत २०० रुपयांपेक्षा जास्त मेहताना दिला असल्यास त्या संबंधींची माहिती कंट्रोलर—जनरलला पुरविली पाहिजे. आयुर्विमा कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरला अगर तत्सम अधिकाऱ्याला दुसऱ्या एखाद्या आयुर्विमा कंपनीच्या अगर बँकेच्या अगर पैसे गुंतविणाऱ्या कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरची अगर तत्सम अधिकाऱ्याची जागा स्वीकारतां येणार नाहीं. तथापि, सरकारच्या संमतीनें दोन कंपन्यांचें एकत्रीकरण अथवा एका विमा कंपनीचें काम दुसऱ्या कंपनीनें आपल्या नांवावर बदल करून घेणें ह्या गोष्टी करतां येतील. विमा एजंटाला द्यावयाच्या कमिशनबद्दल बंधन घालणारीं दोन नवी कलमें घालण्यांत आलीं आहेत. ( १ ) एकच हप्ता घेऊन तात्काळ वर्षासन निर्माण करणारें विमापत्रक अगर एकाच हप्त्याचें विमापत्रक ह्यांच्यावर २ टक्के पेक्षा अधिक कमिशन देतां अगर घेतां येणार नाहीं. ( २ ) ज्या विमापत्रकांत एकापेक्षा अधिक हप्ते घेऊन विलंबित वर्षासन निर्माण केलेलें असेल, अशा विमापत्रकांच्या पहिल्या हप्त्यावर ७॥ टक्के आणि पुढील हप्त्यावर २ टक्के कमिशन देतां येईल. ( ३ ) इतर विमा पत्रकांच्या पहिल्या हप्त्यावर ३५ टक्के, दुसऱ्या व तिसऱ्या हप्त्यावर ७॥ टक्के आणि पुढील हप्त्यावर ५ टक्के कमिशन देता येईल. विमा-कंपनीला आपल्या पहिल्या दहा वर्षांच्या कारकीर्दींत एजंटाला पहिल्या वर्षींच्या हप्त्यावर ४० टक्के कमिशन देतां येईल.

### खर्चावर नियंत्रण

विमा—कंपन्यांच्या खर्चावर महत्त्वाचीं बंधनें घालण्यांत आलीं आहेत. प्रत्येक विमा कंपनीला विमागणितीनें सही केलेलीं माहितीपत्रकें कंट्रोलर जनरलकडे पाठवावीं लागतील. ह्या माहितीपत्रकांत पुढील बाबींचा समावेश करण्यांत आला आहे. नव्या धंद्यासाठी प्रमाण मानलेलीं विम्याच्या हप्त्यांचीं कोष्टकें, मृत्युसंभवासंबंधीं गृहीत धरलेला अनुभव, व्याजाच्या दराची अपेक्षा, खर्चाचें प्रमाण, बोनससाठी हप्त्यांत समावेश केलेला जादा आकार, इत्यादि. ३१ डिसेंबर १९४९ नंतर कोणत्याही आयुर्विमा कंपनीला कोणत्याही वर्षांत त्या कंपनीच्या हप्त्याच्या दरांत खर्चासाठी केलेल्या तरतुदीपेक्षा अधिक खर्च करतां येणार नाहीं. आयुर्विमा व्यतिरिक्त इतर विमा—व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांच्या खर्चावर जनरल इन्शुरन्स कौन्सिलनें ठरविलेल्यापेक्षा अधिक खर्च करतां येणार नाहीं. चीफ एजंट आणि स्पेशल एजंट ह्यांना परवाने

देण्याची आणि त्यांना कामावर ठेवण्यासंबंधीं कांहीं अटी बिलांत समाविष्ट करण्यांत आल्या आहेत. कांहीं विशिष्ट परिस्थितींत विमा–कंपनीचा कारभार पहाण्यासाठीं ॲडमिनिस्ट्रेटर नेमण्याचे अधिकार सरकारनें आपणाकडे घेतले आहेत. विमा–कायद्याच्या भाग २ (अ) मधील कार्य पार पाडण्यासाठीं दोन कौन्सिलस मान्य करण्यांत आलीं आहेत. (१) लाइफ इन्शुरन्स कौन्सिल आणि (२) जनरल इन्शुरन्स कौन्सिल. ह्या संस्थांना कांहीं परिस्थितींत खर्चावर नियंत्रण घालण्याचे अधिकार आहेत. नवीन कायदा अमलांत आल्यावर एका वर्षानंतर कोणत्याही विमा-कंपनीला कलम ६५ (१) मध्यें नमूद केलेला व्यवसाय अगर प्रॉव्हिडंट कंपनीला आपला व्यवसाय करता येणार नाहीं. अशा संस्थांपैकीं ज्या कोऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट अगर तत्सम कायद्याप्रमाणें नोंदलेल्या असतील त्यांना व बिलांत नमूद केलेल्या इतरांना मात्र वरील व्यवसाय करता येईल.

## शेतमजुरांच्या किमान वेतनाची चौकशी

१९४८ च्या मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणें शेतमजुरांच्या किमान वेतनासंबंधीं चौकशी करण्याच्या कामास हिंद सरकारनें सुरवात केली आहे. १५ मार्च १९५१ पूर्वीं, शेतीवर मजुरी करणाऱ्या मजुरांचें किमान वेतन ठरविण्याचा ह्या कायद्याचा हेतु आहे. सध्या पश्चिम बंगाल, बिहार आणि मध्यप्रांत ह्या तीन प्रांतांतून चौकशीच्या कामास प्रारंभ करण्यांत आला आहे. हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारांना अशा सूचना केल्या आहेत कीं, आपआपल्या प्रांतांतून त्यांनीं ६ खेडीं अशा प्रकारची चौकशी करण्यासाठीं निवडावीं. हिंद सरकारच्या ह्या चौकशींत २,००० खेड्यांचा अंतर्भाव करण्यांत येणार आहे. त्यांपैकीं १,२०० खेडीं प्रांतांतील आणि ८०० संस्थानांतील असतील. चौकशीला ३ वर्षें लागतील आणि तीवर १० लाख रुपये खर्च होतील. किमान वेतन ठरविण्याबरोबरच मजुरांची बेकारी अगर रोजगारी, त्यांना असलेलें कर्ज, ह्यासंबंधीं माहितीही गोळा करण्यांत येईल. ह्या माहितीच्या आधारानें शेतमजुरांविषयीं कायदा करण्याच्या कामांत सरकारला मदत होईल, अशी अपेक्षा आहे. पश्चिम बंगाल, बिहार आणि मध्यप्रांत ह्यांच्या शिवाय इतर प्रांतही आपलें एतद्विषयक काम लवकरच सुरू करणार आहेत. हिंदुस्थान अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण करण्याची खटपट सरकार करीत आहे. १९५१ नंतर परदेशांतून अन्नधान्य आयात करण्याचें बंद करणार म्हणूनही सरकारकडून सांगितलें जात आहे. गेल्या कांहीं वर्षांत हिंदुस्थानांत शेतमजुरांचा तुटवडा भासूं लागला आहे. ह्या परिस्थितीला जबाबदार असलेल्या अनेक कारणांवर सरकारनें आरंभिलेल्या चौकशीनें प्रकाश पडणें शक्य होईल. तथापि, शेत–मजुरांच्या बाबतींत होणारी ही चौकशी शक्य तितक्या लवकर पुरी करून १९५१ पूर्वीं, म्हणजे अन्नधान्याची आयात थांबविण्यापूर्वीं, शेत–मजुरांना शेतीवर राबणें अधिक किफायतशीर आहे हें पटवून देणें महत्त्वाचें आहे. त्या दृष्टीनें मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं आपलीं पावलें अधिक जलदीनें टाकणें जरूर आहे.

---

**थंड प्रदेशांत होणारा तांदूळ**– थंड हवेंत सुद्धां पिकेल अशा तऱ्हेचें भात रशिआनें शोधून काढलें आहे असें समजतें. लवकर पिकणाऱ्या आणि एकरीं भरपूर पीक देणाऱ्या ह्या भाताची लागवड रशिआंतील सामुदायिक शेतांवर सध्या करण्यांत येत आहे.

## पाकिस्तानचा निर्यात व्यापार

१९४८ सालीं पाकिस्तान सरकारनें आयातीपेक्षा २८·५ कोटी रुपयांच्या मालाची अधिक निर्यात केली असें समजतें. ज्या देशांची हुंडणावळ सुलभ आहे आणि ज्यांची दुर्लभ आहे अशा दोन्ही देशांत मिळून पाकिस्ताननें ७१ कोटी रुपयांची निर्यात केली. उलट, आयात मात्र फक्त ४३ कोटी रुपये किंमतीच्या मालाची केली. निर्यातीच्या मालाच्या किंमतींत ६ कोटी रुपये किंमतीच्या पुनर्निर्यात केलेल्या मालाचाही समावेश केलेला आहे. १९४८ च्या पहिल्या सहा महिन्यांत पाकिस्ताननें हिंदी संघराज्याला अगर दुर्लभ चलन असलेल्या देशांना माल निर्यात करण्याबद्दल कोणतेंच बंधन पत्करलेलें नव्हतें. त्यामुळें पाकिस्तानची बहुतेक सर्व निर्यात युरोपांतील देश आणि सो. रशिआ ह्यांच्याकडेच झाली. पाकिस्तानांतून मुख्यतः ताग आणि कापूस ह्यांची निर्यात होते. १९४९ च्या दुसऱ्या सहामाहींत मात्र पाकिस्तान सरकारनें कोणच्या देशाला किती माल पाठवावयाचा ह्याबद्दल निश्चित धोरण ठरविलें. त्याचबरोबर, आयात अधिक मोकळेपणानें करण्याचें धोरणही अवलंबिण्यांत आलें. ह्या दुसऱ्या सहा महिन्यांच्या काळांत दुर्लभ हुंडणावळीच्या देशांत पाकिस्ताननें १४ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात केला. उलटपक्षीं ह्या देशांकडून आयात मात्र ९ कोटी रुपये किंमतीच्या मालाची केली. अर्थातच, पाकिस्तानला आपल्या पहिल्या वर्षाच्या परदेशीय व्यापारांत ५ कोटी रुपयांचे डॉलर्स मिळाले. ह्या वर्षीं पाकिस्ताननें ब्रिटनकडून १९ कोटी रुपये किंमतीचा माल विकत घेतला. दुर्लभ हुंडणावळीच्या देशांतून मालाची आयात फारच कमी करण्यांत आली. दुर्लभ चलनाचा मुख्य देश म्हटला म्हणजे अमेरिका. अमेरिकेकडून पाकिस्ताननें ग्राहकांना लागणाऱ्या ६·६ कोटी रुपयांच्या वस्तु आयात केल्या. त्याशिवाय जपान, बेल्जम ह्या डॉलरच्या कक्षेंतील देशांकडूनही थोडा बहुत माल आयात करण्यांत आला. पाकिस्तानकडून ब्रिटननें १४ कोटी रुपयांचा माल घेतला, सो. रशिआनें ८ कोटी रुपयांचा घेतला, इटलीनें ५ कोटी रुपयांचा घेतला, आणि सिलोननें ५ कोटी रुपयांचा घेतला.

परदेशीय व्यापारांत पाकिस्ताननें आपलें बस्तान हिंदपेक्षा अधिक चांगलें बसविलेलें दिसतें. पाकिस्तान हा आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण नाहीं. त्या देशाची आर्थिक परिस्थिति हलाखीची होईल असें मत फाळणीचे वेळीं अनेक तज्ज्ञांनींही व्यक्त केलें होतें. असें असतांना आयातीपेक्षा निर्यात अधिक करण्याचें हिंद सरकारला न साधलेलें काम पाकिस्ताननें कसें केलें, ह्याचा विचार होणें आवश्यक आहे.

## सहकारी शेतीस चालना: २१ लक्ष रुपयांची पंचवार्षिक योजना

मुंबई प्रांतांत सहकारी शेती संस्था स्थापन करण्यासंबंधींची सुधारलेली योजना मुंबई सरकारनें मान्य केली आहे. कॅप्टन एस्. पी. मोहिते यांनीं प्रांतांतील सहकारी शेतीसंबंधीं सादर केलेल्या अहवालांतील शिफारसींच्या अनुरोधानें सुधारलेली योजना तयार करण्यांत आली आहे. या योजनेची मुदत पांच वर्षांची असून तिच्यासाठीं अंदाजें २१,००,००० रु. खर्च येईल. जमिनीचें उत्पन्न वाढविणें, जमिनींचें एकीकरण करून आणि शेतीच्या सुधारलेल्या पद्धतींचा अवलंब करून शेतकऱ्यांना अधिक फायदा करून देणें आणि शेतमालाची विक्री करणें हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. त्याचप्रमाणें शेती हा हंगामी उद्योग असल्यामुळें संस्थेच्या सभासदांना जोडधंदा करता यावा म्हणून ग्रामोद्योग, लहान प्रमाणावरील उद्योगधंदे व जोडधंदे यांचाहि समावेश या योजनेंत करण्याचा विचार आहे.

## आशियांतील सर्व देशांची सहकारी परिषद

### म्हणजे पैशाचा व वेळेचा अपव्यय

"बंगलोर येथें अखिल भारतीय सहकारी परिषद प्रो. हिरालाल काजी ह्यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच भरली होती. तिनें सहकारी चळवळीपुढील कुठल्या महत्त्वाच्या प्रश्नांस हात घातलेलाच दिसत नाहीं. उलट, तिनें "इंडियन को-ऑपरेटिव्ह युनियन" ह्या संस्थेच्या स्वरूपाचा आणखी एक कळस निर्माण करावयाचें ठरविलें आहे. चळवळीपुढील प्रश्न सोडविण्यासाठी नव्या, ताज्या विचारांची आवश्यकता आहे ह्याची सहकारी कार्यकर्त्यांना जाणीव असलेली दिसत नाहीं. अजूनही ते जुन्या चाकोरींतूनच जाऊन कांहीं तरी दृष्टिदृपिक योजना आखण्यांतच संतोष मानतात. बंगलोर येथील परिषदेनें संबंध आशिया खंडाची सहकारी परिषद बोलावण्याचें ठरविलें आहे. तिचेपासून आपल्या देशाचा किंवा सहकारी चळवळीचा काय फायदा होणार आहे, कोण जाणे! कारण, सध्या आशियांतील बहुतेक देश स्वतःचा कम्युनिझमपासून बचाव करण्याच्या प्रयत्नांत गुंतले आहेत आणि गोंधळाच्या व भानगडींच्या परिस्थितींत ते सापडले आहेत. वेगवेगळ्या देशांच्या प्रतिनिधींना अशा परिषदेमुळें एकत्र येतां येऊन मोठालीं भाषणें करण्यास व भक्तिभावाचे ठराव करण्यास संधी मिळेल, हें खरें. पण त्यासाठी परिषद् कशाला हवी? परिस्थिति निवळेपर्यंत ही परिषद् भरविण्याचें स्थगित करतां येईल. आपल्या सहकारी पुढाऱ्यांनीं ज्या प्रकारची परिषद बोलावण्याचें योजिलें आहे, त्या प्रकारची परिषद् भरविण्यास अनुकूल परिस्थिति इतर देशांत आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. अशा निष्फळ कामीं आपला पैसा व वेळ खर्च न करणें शहाणपणाचें होईल." :—कॉमर्स, मुंबई.

### युद्ध टाळण्यासाठी प्रचंड खर्च

अमेरिका आणि पश्चिम युरोपांतील राष्ट्रें दरसाल सुमारें ७,००० कोटी रुपये कम्युनिस्टांच्या संभाव्य चढाईपासून बचाव करण्याच्या तयारीवर खर्च करीत आहेत. हा खर्च सालोसाल वाढतच जाण्याचा संभव आहे. युद्ध संपून चार वर्षें लोटलीं नाहींत, एवढ्यांतच पश्चिम युरोपांतील व अमेरिकेंतील ६० लक्ष लोक लष्करी कामांत गर्क असावेत, ही गोष्ट खरोखरच चिंतनीय आहे. खालील तक्त्यांत वेगवेगळ्या देशांच्या अंदाजपत्रकांतील लष्करी खर्चाचें एकूण खर्चाशीं प्रमाण दिलें आहे

| देश | लष्करी खर्चाचें एकूण खर्चाशीं प्रमाण % |
|---|---|
| अमेरिका | ३४·० |
| ब्रिटन | २३·० |
| फ्रान्स | १८·७ |
| बेल्जम | ९·५ |
| हॉलंड | ३०·० |
| डेन्मार्क | १७·४ |
| नॉर्वे | १०·६ |
| इटली | २३·६ |
| टर्की | २४·६ |
| कॅनडा | १६·९ |

**निर्वासितांना आर्थिक साह्य**—पश्चिम पंजाबमधून येणाऱ्या निर्वासितांना पूर्व पंजाब सरकारनें आणखी आर्थिक मदत मंजूर केली आहे. निर्वासितांसाठी ३,५९,१०० रुपयांचीं कर्जें आणि २,१५,४०५ रुपयांच्या देणग्या मंजूर करण्यांत आल्या आहेत.

### मोटारींत बसल्या बसल्या बँकेशीं व्यवहार

मोटारींतून न उतरतांच पैसे भरण्या-काढण्याची सोय अमेरिकेंत २५० बँकांनीं केली आहे. "कार बँकिंग" खात्यांत खातेदार मोटार घेऊनच जातो. कारकुनाच्या खिडकीशीं जोडलेल्या एका लांब खणांत खातेदार पैसे, स्लिप वगैरे कागद ठेवतो. कारकून खण ओढून घेतो, काम पुरें करतो, खणांत पुनः कागद घालून तो खातेदाराकडे ढकलतो आणि खातेदार मोटार घेऊन बाहेर पडतो. माइकॅफोन द्वारा खातेदार-कारकून जरूर तें बोलूं शकतात. बँकिंगची ही व्यवस्था स्त्रियांना फार पसंत पडली आहे. कारण, बँकेंत जाण्यासाठी त्यांना कपडे बदलण्याची जरुरी नाहीं व मुलांना बरोबर नेण्यास हरकत नाहीं.

### बोनसचा कांहीं भाग नॅ. से. सर्टिफिकेटांचे स्वरूपांत दिला जाणार

हिंदुस्थान सरकारनें ११ जून रोजीं एक ऑर्डिनन्स काढला आहे. त्या अन्वयें, कामगारांना बोनस मंजूर करते वेळीं इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनल हुकूम देऊन, बोनसपैकी कांहीं रक्कम नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांच्या रूपानें देण्यांत यावी असा हुकूम देऊं शकेल. निदान एका महिन्याच्या पगाराइतकी तरी रक्कम कामगारांना रोख मिळावी आणि सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांच्या स्वरूपांत मिळावयाची रक्कम एकूण बोनसच्या निम्म्यापेक्षा जास्त असूं नये, हें मात्र ऑर्डिनन्सनें स्पष्ट केलें आहे.

**हिंदुस्थानांतील क्षयरोगाचे बळी**—हिंदमध्यें दर १२ माणसांच्या मृत्यूंत एक मृत्यु क्षयरोगानें झालेला असतो आणि ह्या रोगाला दरवर्षी ५ लाख लोक बळी पडतात अशी माहिती प्रसिद्ध झाली आहे. हा हिशेब अधिक परिणामकारकतेनें सांगावयाचा तर असें म्हणतां येईल कीं, रोज १,४०० लोक अथवा दर मिनिटाला एक ह्या प्रमाणें हा रोग बळी घेत आहे. क्षयरोग्यांना औषधोपचार करण्यासाठी निरनिराळ्या इस्पितळांत मिळून अवघ्या ८,००० खाटा आहेत. अपुरें अगर वाईट अन्न, रहाण्याच्या जागेंत झालेली गर्दी, इत्यादि कारणांनीं ह्या रोगाचा प्रादुर्भाव होतो.


## महाराष्ट्र सहकारी विद्यालय

### पुणें

या विद्यालयाचे वर्ग ता. १ जुलै १९४९ पासून नं ५ बैरामजी जीजीभाई रोड, पुणें १ येथें सुरू होणार आहेत. या विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असि. को ऑफिसर, खरेदी विक्री संघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गास लागणारें शिक्षण देण्यांत येतें. हा अभ्यासक्रम पुरा करून 'को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा' मिळविणाऱ्यांना सहकारी खात्यामध्यें नोकरीसाठी विशेष पसंती देण्यांत येते. मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांना व सहकारी संस्था व खाते येथील नोकरवर्गास प्रवेश दिला जातो. उमेदवारांनीं ता. २५ जून १९४९ च्या आंत अर्ज करावे.

वा. वि. कुंभारे,
सुपरिन्टेन्डेन्ट.

## महाराष्ट्रांत बँका व विमा कंपन्या ह्यांची वाढ

### गुण आहेत, त्यांचें चीज कसें होईल ?

( नाशिक येथें मे १९४९ अखेर भरलेल्या व्यापारी परिषदेंत, "देना बँके"चे डायरेक्टर श्री. लक्ष्मीकांत शांताराम दाभोळकर ह्यांच्या, डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या भाषणाचा उत्तरार्ध. )

विमाकंपनीसंबंधीं बोलणें झाल्यास या बाबतींत आपण अजून लक्ष घातलेंच नाहीं असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. नांव घेण्यासारख्या आमच्यांत विमाकंपन्या ५ किंवा ६ च असूं शकतील फायर ( आगीचें काम करणारी ) चें काम करणारी तर एकच कंपनी आहे व या सर्वांचें कामही बेताचेंच आहे असें म्हणावें लागेल.

ही परिस्थिती सुधारली पाहिजे व जर महाराष्ट्रीयांमध्यें व्यापार वाढला पाहिजे तर बँका व विमा कंपन्या आमच्यांत अधिक प्रमाणांत वाढल्या पाहिजेत व त्या रीतसर व पायाशुद्ध वाढल्या पाहिजेत. सर्वसाधारणपणें ही परिस्थिती सुधारण्यास १९४३ ते १९४६ पर्यंत उत्कृष्ट वेळ होती. कारण त्या काळांत पैसा खेळता होता; आज कदाचित तशी वेळ किंवा परिस्थिती नसेल, आर्थिक टंचाई कदाचित आपणास भासूं लागल्याचीं चिन्हें दिसत असतील, व याहीं पुढें ही टंचाई वाढावी असें धोरण दृष्टीस पडत असेल. पण त्याही बरोबर आपण हेंही लक्षांत घेतलें पाहिजे कीं धनिक समजल्या जाणाऱ्या लोकांपेक्षां मध्यमवर्गामध्येंच पैशाची बचत करण्याचा कल दिसतो व त्यास पूर्ण प्रोत्साहन देण्यास बँका व विमाकंपन्या या समर्थ होऊं शकतील. कामगार वर्गाची आज तरी निदान आर्थिक परिस्थिति बरीच सुधारलेली आहे यांत संशय नाहीं व अशा वेळेस जर त्यांस पैशाची बचत करण्याची संवय लागली नाहीं तर हातीं आलेला पैसा छानछोकीच्या वस्तू, सिनेमा, नाटकें व पूर्ण दारूबंदी होईपर्यंत दारूंत विरण्याचा बराच संभव आहे, अशा वेळेस बँकेमध्यें ठेवी ( डिपॉझिट्स ) किंवा विमाकंपनीच्या पॉलिसीमध्यें त्यांनी तो गुंतवावा अशी आवड त्यांच्यांत उत्पन्न करून त्यांना ती संवय लावली पाहिजे. महाराष्ट्रीय व्यापारी जर या बाबतींत मन घालून आपल्याकडील कामगार लोकांचा या बाजूनें कल वळवितील व त्यांना प्रोत्साहन देतील तर एका बाजूनें मध्यम व कामगार वर्गास पैसा बाजूस ठेवण्याची संवय होऊन दुसऱ्या बाजूनें बँका व विमाकंपन्या यांस सहजासहजीं प्रोत्साहन मिळेल.

माझ्या मताप्रमाणें, आमच्यांत मोठ्या बँका असल्यास चांगलेंच. पण नाहीपेक्षा लहान बँका, कोऑपरेटिव्ह बँका व क्रेडिट सोसायट्या त्याच प्रमाणें शेअरहोल्डरच्या विमाकंपन्यांपेक्षां म्युच्युअल विमाकंपन्या असाव्या. यामुळें बँका व विमाकंपन्या यांच्याकडे असलेल्या ठेवींचा उपयोग महाराष्ट्रीयांना सहजासहजी मिळूं शकेल. विमाकंपनी ही बँक नसल्यानें ती आपल्याकडील ठेवी अधिक सवलतीनें व दीर्घमुदतीनें उद्योगधंद्यांच्या मदतीकरतां देऊं शकेल व अशा मदतीची महाराष्ट्रास बरीच जरूरी आहे.

आज हिंदुस्थानांत बँका व विमाकंपन्या या बऱ्याच प्रमाणानें कमी आहेत, मग महाराष्ट्रांत त्या कमीच असणार व याच कारणांकरितां त्यांची वाढ हळुहळु का होईना, पण ती करण्याकडे महाराष्ट्रीयांचें लक्ष वेधलें पाहिजे.

व्यापारधंद्याच्या कोणत्याही क्षेत्रांत विशेषत: बँका किंवा विमाकंपन्या यांची मांडणी लहान प्रमाणांत का होईना पण त्यांचीं सूत्रें समाजांतील उद्योगी, विश्वस्त, कार्यकारी व कर्तबगार इसमांचे हातांत राहून केवळ त्या बळकट करण्याकडेस त्यांचें लक्ष वेधलें पाहिजे. माझें म्हणणें असें नव्हे कीं महाराष्ट्रीयांनीं केवळ महाराष्ट्रीयच बनून रहावें व आपल्यापुरतेंच पहात बसावें. इतराबरोबर कामें करून त्यांच्यांत मिळून मिसळून वागून त्यांच्यापैकीं आपण एक बनून आपल्या ज्ञानाचा फायदा इतरांस देऊन व इतरांच्या ज्ञानाचा फायदा आपण करून घ्यावा. परंतु असें करीत असतां आपण महाराष्ट्रीय आहोंत, हें विसरण्याचें कारण नाहीं. यांत इतरांचा फायदा होऊन महाराष्ट्रीयांचाही फायदा तर होईलच.

वर म्हटल्याप्रमाणें, महाराष्ट्रीयांकडे बँका व विमाकंपन्या चालविण्यास लागणाऱ्या सर्व गुणांचें गाठोडें असतां त्याचा उपयोग व चीज व्हावें तसें अजून झालेलें दिसत नाहीं. कोणत्याही कंपनीची उभारणी शुद्ध व बळकट पायावर झाली पाहिजे, मनाचा कोतेपणा, एकमेकांतील खोटी स्पर्धा, कुटुंबांतील मत्सर धंद्यावर आदळणें, या धोक्यापासून महाराष्ट्रीयांनी अलिप्त राहिलें पाहिजे. बँका व विमाकंपन्या चालविण्यास लागणारे मुख्य गुण म्हणजे सचोटी, धीर, चिकाटी, आत्मविश्वास, निरलस स्वभाव, गोड वाणी व इतरांत मिसळून वागणें यांचा साठा आपल्याकडे असला पाहिजे.

जेथें आमचे व्यापारांत पुढें असलेले देशबांधव एजन्सीचा विचार करतात तेथें आपण नोकरीचा मार्ग शोधतो. जेथें ते कमिशन–डिस्‌काउन्टच्या गोष्टी करतात, तेथें आम्ही पगाराचे बोल बोलतों. कोणतीही कंपनी काढण्याचे किंवा व्यापार करण्याचे सुरुवातीस जेथें ते धीर धरून चिकाटी दाखवितात व यशाचा विचार करतात, तेथें आम्ही "यश न आलें तर" "फायदा न झाला तर" याचाच विचार प्रथम करूं लागतों. सारांश, अशामुळें महाराष्ट्रीयांच्या गुणाचें चीज न होतां केवळ धडाडी किंवा धाडस नसल्यामुळें महाराष्ट्रीयांचें जीवन दिवसेंदिवस निस्तेज बनत चाललें आहे. ही वृत्ति बदलली पाहिजे. तरच महाराष्ट्रीयांचें खरें स्वरूप दिसूं लागेल.

महाराष्ट्रीय लोकांमध्यें आपल्या व्यापाराची रीतसर जाहिरात करण्याची प्रथा अजून दिसून येत नाहीं; ही जरी मोठ्या महत्त्वाच्या मुद्याची बाब नसली तरी व्यापाराचें तें एक अंग बनून राहिलें आहे हें विसरतां कामा नये. जाहिरात ही आजच्या युगांत व्यापार वाढविण्याचें मुख्य साधन आहे व जाहिरात ही केवळ आपल्या गांवीं आपल्याकरतांच करावयाची नसते. दुसऱ्यांचे नजरेखालून आपल्या कंपनीचें किंवा बँकेचें नांव जावें हा मुख्य उद्देश असून जेथें व्यापारधंदा पुढें–पाठीमागें आपण वाढवूं शकूं त्या ठिकाणीं त्याची पूर्व तयारी जाहीरातच करूं शकेल. या बाबतींत आपण पाश्चिमात्य देशांचें अनुकरण केलें पाहिजे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, स्वित्झरलंड, वगैरे देशांत होणाऱ्या मालाची व तिकडील बँका किंवा विमा कंपन्या यांची जाहिरात हिंदुस्थानांत रीतसर होत असते तशी आपल्याकडील कंपनीची जाहिरात इकडे होत नाहीं. कंपनी काय करते, तिचें भांडवल किती, तिची गंगाजळी किती, विमा कंपनीचे बाबतींत त्यांनीं आजपर्यंत पॉलसीहोल्डर्सना किती रक्कम परत केली आहे, याची सर्व विगत मधून मधून इकडील वर्तमानपत्रांत फडकत असते. आपल्याकडे बेळगांव किंवा कोल्हापूर इकडील एखाद्या वर्तमानपत्रांत देखील तिकडे बँका किती व कोणकोणत्या आहेत हेंही कदाचित् पहावयास मिळणार नाहीं. अशी परिस्थिति कां असावी? जाहिरातीसाठीं वापरला जाणारा पैसा तो केवळ खर्च नसून तो एक धंदा व

उत्पन्न हीं दोन्हीही वाढविण्याचा मार्ग आहे हें अजून आपल्या लक्षांत जितकें यावें तितकें येत नाहीं. यामुळें बऱ्याच अंशीं आमच्यांतील बँका व विमाकंपन्या यांची वाढ तर होत नाहींच पण खुंटत आहे.

अभिमानाची गोष्ट ही कीं, महाराष्ट्रीयांत किर्लोस्कर, ओगले, ढहाणूकर, शिरगांवकर, वेलणकर, आपटे, पुराणिक, टोपीवाले, डोंगरे हे आपआपल्यापरीनें आपल्या क्षेत्रांत कामें करीत आहेत व त्यांच्या कामाचा फायदा महाराष्ट्रीयांसच नव्हे तर परप्रांतीयांस देखील मिळत आहे. मग आपण थोडें अधिक मनावर घेतलें तर आज असलेल्या महाराष्ट्रांतिल बँका किंवा विमा कंपन्या यांस अधिक सुदृढ करून नवीन प्रस्थापित करण्यास वेळ लागणार नाहीं. जर महाराष्ट्रीयांस व्यापारधंद्याची व औद्योगिक क्षेत्रांत काम करण्याची आवड आहे व त्या चालविण्याची धमक आहे तर त्यासाठीं लागणारा पैसा मिळविण्यास किंवा धंद्यांतल्या पैशाचा सांठा करण्यास दुसऱ्या बँकांकडे आपणांस कां पहावें लागतें? परक्यापासून मदतीची अपेक्षा करणें हें जितकें प्रांतास अशक्त करूं शकतें, तितकेंच स्वावलंबन प्रांतास बळकट करूं शकतें; महाराष्ट्राचा आपल्याला अभिमान असला पाहिजे. आपुलकीची भावना असली पाहिजे, तो सधन करण्याची आवड असली पाहिजे. बळकट करण्याची तळमळ पाहिजे. स्वाभिमान, स्वावलंबन, संरक्षण, स्वास्थ्य, याची जाणीव पाहिजे व अशा रितिने जो आपल्या प्रांताकडे पाहील तोच देशहितही पाहूं शकेल. डॉ. जॉनसन्नें म्हटल्याप्रमाणें "ज्याला आपल्या देशाबद्दल प्रेम वाटत नाहीं, त्याला दुसऱ्या कशाचाच जिव्हाळा वाटणार नाहीं." ( He who loves not his country can love nothing ) या दृष्टीनें महाराष्ट्राचा व्यापारधंदा व त्याहीपेक्षां अधिक आवश्यक असणाऱ्या बँका व विमाकंपन्या यांची अत्यंत आवश्यकता आहे, इतकें मी म्हणूं शकेन.

( समाप्त )

### दि सर्वोदय फायनॅन्स कॉर्पोरेशन लि., पुणें

ही कंपनी योग्य व लायक अशा नवीन उद्योगधंद्यांना त्यांच्या जरूरीचे वेळीं योग्य तारणावर व माफक व्याजांत आर्थिक मदत करणार आहे. व्यापारी, कारखानदार, मॅन्युफॅक्चरर्स ( उत्पादक धंदे ) वगैरे लोकांना व त्यांच्या संस्थांना प्राय: ही मदत होणार आहे. धंद्याला वाव चांगला असूनही योग्यवेळीं मदतीचे अभावीं ते पुढें येऊं शकत नाहींत. कित्येक वेळीं तर अगदी अल्प मदतीचे अभावीं धंद्याची कुचंबणा होते, ही गोष्ट प्रत्येकाला माहीत आहे. अशा वेळीं त्यांना फार व्याजाचा बोजा न पडतां मदत मिळाली तर ते थोड्या मदतीचे जोरावर आपआपल्या पायांवर उभें रहाण्याइतके समर्थ होतात. उलट, धंदा कितीही योग्य व निश्चितपणें किफायतशीर असला तरी केवळ लहानच काय पण मध्यम प्रतीचे धंदेही नुकसानींत येतात व त्यांना बँका वगैरे प्रचलित आर्थिक संस्था म्हणाव्या तितक्या उपयोगी पडत नाहींत. म्हणूनच हिंदी सरकार व प्रांतिक सरकारें नवीन धंद्यांच्या मदतीकरितां स्वत:च्या फायनान्स कॉर्पोरेशन्स काढीत आहे. तीच गोष्ट खाजगी रीतीनें व जनतेच्या सहाय्यानें हीं कॉर्पोरेशन करणार आहे. या कंपनीचा विशेष म्हणजे कंपनीच्या शेअरहोल्डरांना योग्य नफा देतां यावा व धंद्यांनाही माफक व्याज आकारतां यावें म्हणून कंपनीचे मॅनेजिंग एजंट शेअरवर कमींतकमी ५ टक्के व्याज मिळेपर्यंत विनावेतन काम करणार आहेत. मेसर्स अभ्यंकर आणि कं. कडे मॅनेजिंग एजन्सी आहे. कंपनीनें ५ लक्ष रुपयांचे शेअर्स विक्रीस काढले आहेत. प्रत्येक शेअर २५ रुपयांचा आहे. शेअर्सची वाटणी ५% प्रेफरन्स व ऑर्डिनरी भागांत सम प्रमाणांत करण्यांत आली आहे.


दि सेन्ट्रल म्युच्युअल
विमा कंपनी, लिमिटेड
हेड ऑफिस:—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.
★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.
आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.
शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर.

—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था
दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २
—आमचीं वैशिष्ट्यें—
( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स तावडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.
विमा अथवा एजन्सी यासाठीं लिहा अगर भेटा.
—मॅनेजिंग डायरेक्टर

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स बुधवार चौक, पुणें






## लोकमान्य इंडस्ट्रीज लि., पुणें

### पहिल्या वर्षांतील प्रगति

वरील कंपनी २७ डिसेंबर १९४७ रोजीं नोंदण्यांत आली. तिचा ३१ मार्च, १९४९ असेरचा अहवाल व हिशेब मंजूर करण्यासाठी भागीदारांची १९ जून रोजीं पहिली वार्षिक साधारण सभा भरेल. प्रिंटिंग व लिथोग्राफिक शाई तयार करण्याचें काम कंपनीनें प्रथम हातीं घेण्याचें ठरविलें आहे. कंपनीचे एकूण सुमारें ६१ हजार रुपयांचे भाग खपले आहेत. पर्वतीचे पायथ्याशीं इमारतीसाठी कंपनीनें सोइस्कर जागा घेतली आहे. त्या जागेवर आवश्यक तें इमारत काम सुरू आहे. तिला एकूण सुमारें ३० हजार रु. खर्च येईल. सुमारें ५० हजारांची यंत्रसामुग्री अमेरिकेंतून मागिवली आहे. तिचेपैकीं ३० हजारांची प्रत्यक्ष आली आहे. लॅबोरेटरी प्लॅन्ट इंग्लंडमधून मागविलें आहे. कंपनीचे कन्सल्टिंग केमिस्ट, डॉ. के. के. ढोळे, एम. एससी., पीएच. डी. ह्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या फॅक्टरी केमिस्टला कामाचा अनुभव कानपूर व कलकत्ता येथें मिळवून दिला जात आहे. प्राथमिक उत्पादनास आवश्यक तो कच्चा माल कंपनीनें मिळवून ठेवला आहे.

कंपनीनें मुंबई सरकारकडे ८५,००० रुपयांचें स्टेट-एड लोन मागितलें आहे. अर्जाचा समाधानकारक निकाल लवकरच लागेल अशी डायरेक्टर्सनीं आशा व्यक्त केली आहे. अहवालाचे मुदतीमधील महाराष्ट्रांतील विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेतां, कंपनी प्रत्यक्ष उत्पादन सुरू करूं शकली नसली तरी तिनें प्रगति चांगली केली आहे, हें दिसून येईल. रावबहादुर ग. गो. शेंबेकर हे कंपनीचे चेअरमन असून डब्ल्यू. एन. कलंत्रे आणि कं.कडे मॅनेजिंग एजन्सी आहे.

---

### इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि.

ही कंपनी ग्रेट ब्रिटनमधील सर्वात मोठी औद्योगिक कंपनी आहे. तिच्या अनेक उप-कंपन्या आहेत. एकट्या ग्रेट ब्रिटनमध्येंच तिच्या नोकरांची संख्या सुमारें १,००,००० आहे. १९४८ असेरची तिची जिंदगी २५० कोटी रुपयांवर आहे. त्या वर्षी कंपनीला २१७ कोटी रुपये उत्पन्न झालें. त्यापैकीं एक तृतीयांश उत्पन्न निर्गत मालापासून मिळालें. भागीदारांना १०% डिव्हिडंड देण्यांत आलें.

---

### दि पशिॲटिक कमार्शिअल बँक लि., लाहोर

स्टेट बँक ऑफ पाकिस्ताननें वरील बँकेस नव्या ठेवी घेण्यास बंदी केली आहे. ठेवीदारांच्या हितास तिचा व्यवहार बाधक होत आहे, असें स्टेट बँकेचें मत झालें आहे.

---

### अमेरिकन चलनी नोटेवर स्त्रीची सही

मिसेस, जॉर्जिया क्लार्क ह्या स्त्रीची अमेरिकेच्या ट्रेझररच्या जागीं नेमणूक होणार आहे. म्हणजे, तिची सही आतां अमेरिकन चलनी नोटांवर दिसूं लागेल. अमेरिकन नोटांवर स्त्रीची सही ह्यापूर्वी कधींही झळकली नव्हती.

---

### लेडी रोझिना देशमूख

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर चिंतामणराव देशमूख, ह्यांच्या पत्नी लेडी रोझिना ह्या लंडन येथें ता. २७ मे रोजीं मृत्यु पावल्या.


बेडेकर मसाले वापरा

नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला
ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.
ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.
टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादींसाठी चौकशी करा:—
दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.
९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.
तार : SAHYOG फोन : ३४५१९

औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें
(१) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज (ले.:–जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ.)
(२) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन (ले.:–जे. बी. टेलर, किं. १ रु.)
(३) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट (ले.:–. रेवि ॲले, किं. २ रु.)
(४) इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज अँड व्हिलेज इंडस्ट्रीज इन बॉंबे प्रॉव्हिन्स (ले.:– एल. एन. रेणु, किं. १ रु. ४ आ.)

खून साफ करनेमें मशहूर डॉ. वामन गोपाल का सार्सापरिला


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद् वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.